जिल्हा परिषद उस्मानाबाद
शिक्षण विभाग
मेन रोड, उस्मानाबाद – पिन कोड 413501
दुरध्वनी क्रमांक 02472-224184 फॅक्स क्रमांक – 02472-223377
Email : mdmosmanabad@gmail.com

जा.क्र./जिपउ/शिक्षण/प्रा-२/कावी/ १५५५ /२०२२ दिनांक :- १७/ १० /२०२२

**बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळांना नमूना दोन मान्यता प्रमाणपत्र**

आपले पत्र दिनांक **१३.०६.२०२२** च्या आर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेची केलेली तपासणी या आधारे मी **डॉ. अरविंद मोहरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद उस्मानाबाद दिनांक ०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२५** पर्यंत **तीन** वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता १ ली ते ८ वी पोदार इंटरनॅशनल स्कूल, उस्मानाबाद ता. जि. उस्मानाबाद** या शाळेस खालील अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या अधिन राहून मान्यता देण्यात येते.

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही.
२. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) मधिल तरतूदीचे शाळा पालन करील.
३. शाळा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण देईल.
४. संस्था/शाळा कोणतेही कॅपिटेशन फि वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या मातापित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
५. कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
६. **(एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास ती/त्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत राखून ठेवले जाणार नाही.किंवा प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
   **(दोन)** कोणत्याही बालकास शारीरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
   **(तीन)** कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
   **(चार)** प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
   **(पाच)** विकलांग/विषेश गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदी नुसार समावेश करण्यात येईल.
   **(सहा)** अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारीत केलेल किमान अर्हताधारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल.
   **(सात)** अधिनियमाच्या कलम २४ (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तीची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि
   **(आठ)** शिक्षकाने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेवूनये याची सुनिश्चिती शाळा करील.
७. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या आभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

८. शाळा अधिनियमाचा कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळा उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईन.

९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.तपासणीच्या वेळी उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे आहेत.

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - **८००० चौ.फुट.**
- एकूण बांधकाम क्षेत्र - **३०६१ चौ.फुट.**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ - **४५०० चौ.फुट.**
- वर्गखोल्यांची संख्या - २३
- कार्यालय,भांडार,मुख्याध्यापकाची खोंली - **१७**
- मुलांसाठी व मुलींनसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे, जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणि असेल- **आहे**.
- पिण्याच्या पाण्याची सुविधा- **आहे**.
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाक घर - **लागू नाही**.
- अध्यापन,अध्ययन सहित्य/खेळ व क्रिडाविषयक सामग्री/ग्रंथालय याची उपलब्धता- **आहे**.
- वाचन साहित्य विनायासास उपलब्ध- **आहे**.
- प्रशिक्षीत इंग्रजी माध्यमाच्या शिक्षकांची नियुक्ती करण्याच्या आटिवर मान्यता देण्यात येते.

१०.मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविण्यात येणार नाहीत.

११.शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येईल.

१२.शाळा,सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० (११६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनीक विश्वस्थ अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थे मार्फत चालविण्यात येईल.

१३.शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसाठीच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येणार नाही.

१४.शाळेचे लेखे, सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षण व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत,प्रत्येक विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी या कार्यालयास पाठवण्यात यावी.

१५.तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक २७२९ असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना तो नमुद करावा.

१६.शिक्षण विभाग वेळोवेळी मागणी करील असे अहवाल व माहिती सादर करणे आवश्यक राहील व शाळेच्या कामकाजातील त्रुटी दुर करण्यासाठी दिलेल्या सुचनांचे पालन करावे लागेल.

१७.संस्थेच्या नोंदणीचे कोणतीही त्रुटी असल्यास नुतनीकरणाच्या वेळी त्याची सुनिश्चीती करावी अन्यथा शर्ती उल्लंघन केले समजून पुढील शाळा मान्यता काढण्याची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

१८.जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती लागू आहेत.

**( डॉ. अरविंद मोहरे )**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद,उस्मानाबाद**